# बृहन्मुंबई महानगरपालिका

## 'निरीक्षक (अनुज्ञापन)' पदासाठी महानगरपालिकेतील कर्मचा-यांमधून विहीत अर्हतेनुसार उमेदवारांची निवड करण्याबाबत

अनुज्ञापन खात्याच्या आस्थापनेवरील निरीक्षक (अनुज्ञापन) रु.5200-20200+जीआरपी 2800/- या वेतनश्रेणीत काम करण्यास इच्छुक असलेल्या विहित अर्हता धारण करणा-या मुंबई महानगरपालिकेतील नियमित सेवेत असणा-या लिपिक व तत्सम संवर्गातील म्हणजेच लिपिक, लिपिक-नि-टंकलेखक, टंकलेखक, कनिष्ठ लघुलेखक, सूचना लिपिक, जलमापक निरीक्षक, कनिष्ठ वाहतूक पर्यवेक्षक, भाडे संकलक, रोख प्रापक लिपिक, लिपिक-नि-रोखपाल, भांडार लिपिक, भांडारपाल-नि-समयलेखक, पर्यवेक्षक-नि-भांडारपाल, कनिष्ठ लेखापरीक्षा व लेखा सहाय्यक, कनिष्ठ वेतनप्रदाता, विधि खात्यातील व्यवस्थापन लिपिक (अर्हतारहित), सर्वसाधारण लिपिक, न्यायालयीन लिपिक, अधिपत्र लिपिक, शोधक लिपिक, कनिष्ठ विधि सहायक, वरिष्ठ न्यायालयीन लिपिक (अर्हतारहित) या पदावर दिनांक 04.09.2016 रोजी किमान 5 वर्षे अखंड सेवा झालेल्या पदवीधर पुरुष / महिला कर्मचा-यांकडून सोबत जोडलेल्या विहित नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत.

*विद्यमान धोरणानुसार माध्यमिक शालांन्त प्रमाणपत्र परीक्षा किंवा तत्सम किंवा उच्च परीक्षा 100 गुणांची प्रश्नपत्रिका असलेला मराठी विषय (उच्चस्तर व निम्नस्तर) घेऊन उत्तीर्ण झालेले किंवा महापालिका प्रशासनामार्फत घेण्यात येणारी मराठी भाषेची खात्यांतर्गत परीक्षा उत्तीर्ण झालेले कर्मचारीच सदर परीक्षेस बसण्यास पात्र असतील.*

परिपत्रक क्र.एमपीएम/दोन/6381, दि 19.11.2005 अन्वये निर्धारित केलेल्या धोरणांमुळे एमएससीआयटी (MSCIT) संगणकाची परीक्षा ज्या कर्मचा-यांनी उत्तीर्ण केली आहे तेच कर्मचारी सदर परीक्षेस बसु शकतील.

अर्जदाराने आपले अर्ज खातेनिहाय वरिष्ठांमार्फत दिनांक 27.10.2016 पर्यंत प्रमाणित करुन (कार्यालयीन वेळेत) अनुज्ञापन अधीक्षक यांचे कार्यालयात पोहोचतील याची दक्षता घ्यावी. सदर कालावधीनंतर प्राप्त झालेले तसेच अपूर्ण, विहित नमुन्यात न भरलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत, याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

**निरीक्षक (अनुज्ञापन) या पदाकरिता दिनांक 31.08.2016 पर्यंत रिक्त होणारी पदे खालीलप्रमाणे आहे.**

| | प्रवर्ग | अनुशेष | | | समांतर आरक्षण | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | रिक्त पदे | संभाव्य | एकूण | उर्वरित अनुशेषापैकी महिलांसाठी 30 टक्के | उर्वरित अनुशेषापैकी अपंग 3 टक्के |
| 1) | अनुसूचित जाती | 3 | - | 3 | 1 | 4 – श्रवणशक्तीतील दोष |
| 2) | अनुसूचित जमाती | 11 | - | 11 | 3 | |
| 3) | वि.जा.(अ) | 0 | - | 0 | 0 | |
| 4) | भ.ज.(ब) | 1 | - | 1 | 0 | |
| 5) | भ.ज.(क) | 0 | - | 0 | 0 | |
| 6) | भ.ज.(ड) | 0 | - | 0 | 0 | |
| 7) | वि.मा.प्र. | 2 | - | 2 | 1 | |
| 8) | इ.मा.व. | 6 | 1 | 7 | 2 | |
| 9) | खुला | 2 | - | 2 | 1 | |
| | एकूण | 25 | 1 | 26 | 8 | |

सदर अनुशेषामध्ये भविष्यात वाढ होण्याची शक्यता आहे. तसेच सद्यःस्थितीत ज्या प्रवर्गातील अनुशेष निरंक दाखविण्यात आलेला आहे तो भविष्यात निर्माण होण्याची शक्यता आहे. त्याकरिता सर्व मागासवर्गातील तसेच खुल्या प्रवर्गातील कर्मचा-यांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

**निरीक्षक (अनुज्ञापन) या पदाकरिता निवड प्रक्रिया खालीलप्रमाणे आहे.**

1) उमेदवारांना लेखी परीक्षा द्यावी लागेल. सदर लेखी परीक्षा एकूण 100 गुणांची राहील.

2) लेखी परीक्षेच्या अभ्यासक्रमामध्ये पुढील विषयांचा अंतर्भाव असेल.
अ) अनुज्ञापत्रे देण्याबाबत महानगरपालिकेच्या अधिनियमातील तरतूदी.
ब) सामान्य ज्ञान
क) प्राथमिक गणित
ड) 1) -निबंध लेखन 2) - सारांश लेखन

परीक्षेस बसणा-या खुल्या प्रवर्गातील उमेदवारांना रु.100/- व मागासप्रवर्गातील उमेदवारांना रु.50/- इतके परीक्षा शुल्क परीक्षा दिनांकापूर्वी भरावे लागेल. हे परीक्षा शुल्क अनुज्ञापन अधीक्षक यांचे कार्यालय येथे स्वीकारण्यात येईल. परीक्षा दालनामध्ये ओळखपत्र व परीक्षा शुल्क भरल्याची पावती दाखविल्याशिवाय परिक्षेस बसू दिले जाणार नाही.

प्रश्नपत्रिकेचे स्वरुप खालीलप्रमाणे असेल.

| | विषय | | गुण |
|---|---|---|---|
| अ) | महानगरपालिका अधिनियमांतर्गत अनुज्ञापत्र देण्याची तरतूद (प्रकरण) कलम 61, 63, 313A/ 313B & 313(i)(b)(c), 314, 314 (a)(b)(c), 328/328A, 393, 394, 394A, 396(1)(2), 412A, 471, 472, 479(1)(2)(3)(4)(5), 489(1), 490(1)(2)(3)(4), 488, 483, 516AA, 516AAA | | 40 |
| ब) | सामान्य ज्ञानावरील प्रश्न हे विशेषतः रसायनशास्त्रातील ज्ञान तपासणारे असतील (इयत्ता 8 ते 10 वी च्या रसायनशास्त्राच्या आधारावर) | | 20 |
| क) | प्राथमिक गणित | | 20 |
| ड) | 1) - निबंध लेखन | (10) | 20 |
| | 2) - सारांश लेखन ( इंग्रजीमध्ये) | (10) | |

मा. आयुक्त यांचे परिपत्रक क्र.साप्रवि/521/म.प., दि.24.09.2008 मधील निर्देशानुसार परीक्षेची प्रश्नपत्रिका फक्त मराठीत छापण्यात येईल व प्रश्नांची उत्तरे फक्त मराठी भाषेत लिहिणे (इंग्रजीमध्ये सोडविण्याचे अनिवार्य प्रश्न वगळता) अनिवार्य राहील.

सदर लेखी परीक्षेमध्ये उत्तीर्ण होण्यासाठी उमेदवाराने 'अ' व 'ब' विभागात प्रत्येकी किमान 40% गुण मिळविणे आवश्यक राहील. तसेच निरीक्षक पदासाठी पात्र होण्यासाठी 100 पैकी एकूण किमान 50 गुण मिळविणे आवश्यक आहे.

3) 'निरीक्षक (अनुज्ञापन)' या पदाच्या निवडीसाठी खालीलप्रमाणे निकष आहेत.

I) 'निरीक्षक(अनुज्ञापन)' पदाच्या नियुक्तीकरिता उमेदवाराने सदर पदासाठी घेण्यात येणारी खात्यांतर्गत पात्रता लेखी परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

II) पात्रता परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांची त्यांच्या लिपिक व तत्सम संवर्ग, कनिष्ठ लेखा परीक्षक व लेखा सहाय्यक इत्यादी पदावरील परस्पर सेवाज्येष्ठतेनुसार मागासवर्गीयांचे आरक्षण विचारात घेऊन निवड करण्यात येईल.

III) निवड यादी तयार करतांना दोन विभिन्न संवर्गातील उमेदवारांची सेवाज्येष्ठता निश्चित करण्यासाठी त्या संवर्गातील उमेदवाराच्या नेमणूकीचा दिनांक आधारभूत समजण्यात येईल. विभिन्न संवर्गातील उमेदवारांची नेमणूकीची तारीख समान असल्यास ज्यांची महापालिकेतील सेवा जास्त असेल त्यांना सेवाज्येष्ठ समजण्यात येईल. तेही समान असल्यास उच्च शैक्षणिक अर्हताधारण करणा-या उमेदवारांना सेवाज्येष्ठ समजण्यात येईल व तेही समान असल्यास वयाने ज्येष्ठ असलेल्या उमेदवारास सेवाज्येष्ठ समजण्यात येईल.

4) उमेदवारांची निरीक्षक (अनुज्ञापन) या पदावरील ज्येष्ठता ही त्यांच्या निरीक्षक (अनुज्ञापन) या पदावरील नियुक्तीच्या दिनांकापासून असेल. अपवादात्मक परिस्थितीत प्रशासकीय सोईकरिता ज्या उमेदवारांना निरीक्षक (अनुज्ञापन) या पदावरील नियुक्तीकरिता त्यांच्या खात्याकडून कार्यमुक्त न केल्यास उमेदवारास पदग्रहण करण्यासाठी 1 महिन्याचा कालावधी देण्यात येईल.

**<u>सदर पदासाठी आवश्यक असलेली</u>**

| अनु क्र. | शारिरीक पात्रता व क्षमता | पदाची कर्तव्ये व जबाबदा-या |
|---|---|---|
| 1 | S- Sitting ( बसणे ) | फेरीवाल्यांच्या अतिक्रमण निर्मूलनाबाबत कारवाई करणे, अनुज्ञापत्रे देण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करणे इत्यादी. |
| 2 | ST- Standing ( उभे राहणे ) | |
| 3 | W-Walking ( चालणे ) | |
| 4 | SE-Seeing ( बघणे ) | |
| 5 | RW-Reading and Writing ( वाचणे व लिहीणे ) | |
| 6 | C-Communication ( संवाद साधणे ) | |
| 7 | BN-Bending ( वाकणे ) | |
| 8 | H-Hearing ( ऐकणे ) | |

5) उमेदवारांची नेमणूक मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीतील अनुज्ञापन खात्याच्या कोणत्याही विभागात बदली योग्य असेल.

6) उमेदवाराची नियुक्ती 3 वर्षाच्या परिविक्षाधीन कालावधीसाठी असेल.

7) महानगरपालिकेच्या हद्दीतील अतिक्रमण निर्मूलन वाहनांवर बसून निरीक्षक म्हणून प्रथम काम करावे लागेल.

8) सदर पदाकरिता वयोमर्यादा ही खुल्या प्रवर्गातील कर्मचा-यांकरिता दि.04.09.2016 रोजी पर्यंत 38 वर्षे इतकी असेल तर मागासवर्गीय कर्मचा-यांकरिता वयोमर्यादा ही 43 वर्षे इतकी असेल.

9) उप आयुक्त (सा.प्र.) यांच्या परिपत्रक क्र.एमपीएम/1713, दि.07.01.1993 अन्वये निवड झाल्याप्रमाणे जे कर्मचारी पद स्वीकारतील त्यांना नियुक्ती झाल्यापासून दोन वर्षाच्या कालावधीमध्ये खालीलप्रमाणे लेखी विकल्प द्यावा लागेल.

अ) निवड झालेल्या पदावर कायम राहण्यास तयार आहेत

**किंवा**

ब) त्यांना त्यांच्या मूळ खात्यात परत जाण्याची इच्छा आहे.

10) शासनाच्या धोरणानुसार अपंग व महिलांसाठी आरक्षण ठेवण्यात येईल. तथापि, महिला आरक्षणांतर्गत एखादया प्रवर्गात त्याप्रमाणात महिला उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदर पद त्या प्रवर्गातील पुरुष उमेदवारांमधून भरण्यात येतील.

11) पदसंख्येत तसेच आरक्षण / अनुशेष यात बदल होण्याची शक्यता आहे.

12) विजा(अ), भज(ब), भज(क) व भज(ड) या प्रवर्गातील विहित आरक्षण त्या त्या प्रवर्गातील कर्मचारी उपलब्ध न झाल्यास अंतर्गत परिवर्तनीय राहील.

13) विजा(अ), भज(ब), भज(क), भज(ड), वि.मा.प्र., इ.मा.व. व खुला प्रवर्गातील महिला कर्मचा-यांच्या बाबतीत सामाजिक तसेच समांतर आरक्षणाचा फायदा त्या प्रवर्गातील जे कर्मचारी प्रगत व उन्नत व्यक्ती गटात मोडत नसतील यांनाच अनुज्ञेय राहील. यास्तव, त्यांनी त्याबाबतीत सक्षम प्राधिका-यांकडून प्राप्त केलेले विहित नमुन्यातील नवीनतम प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

14) शासन निर्देशानुसार मागावर्गीय उमेदवारांसाठी दिनांक 12 डिसेंबर 2011 मधील शासन निर्णयानुसार नियुक्ती आदेश प्राप्त झाल्यानंतर अशा उमेदवारांनी नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या आत जातवैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

15) मागासवर्गीय कर्मचा-यांनी त्यांच्या जातीच्या विहित नमुन्यातील सक्षम प्राधिका-यांकडुन प्राप्त केलेल्या जात प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत अर्जासोबत जोडून नियुक्तीच्या वेळी मूळ जाती प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

16) परिपत्रक क्र.एमपीएम/2/6381, दि.19.11.2005 नुसार उमेदवारांनी एम.एस.सी.आय.टी. संगणकाची परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. तथापि, एम.एस.सी.आय.टी. परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. एमएससीआयटी परीक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे त्याशिवाय परिक्षेस बसू देणार नाही.

17) सर्व आवश्यक प्रमाणपत्राच्या (जसे शैक्षणिक प्रमाणपत्र, मागासवर्गीय असल्यास त्याबाबतचा दाखला इत्यादी) प्रतिलिपी अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. मात्र सदर प्रमाणपत्रांच्या मूळ प्रती नियुक्तीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील, याची अर्जदारांनी नोंद घ्यावी.

18) अर्जात नमूद केलेली माहिती चुकीची किंवा खोटी आढळल्यास कर्मचा-याची उमेदवारी / निरीक्षक (अनुज्ञापन) पदावरील नियुक्ती कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्याचा अधिकार अनुज्ञापन अधीक्षक यांना राहील. शिवाय अशा कर्मचा-यांविरुध्द कारवाई केली जाईल.

19) ज्या उमेदवारांनी परिक्षेस बसण्याकरिता अर्ज केलेला आहे व ते परीक्षेस गैरहजर राहिल्यास त्या उमेदवाराकडून रु.1000/- दंड वसूल करण्यात येईल.

20) I) परिपत्रक क्रमांक एमबीसी / 160 दि. 07.05.2014 नुसार परीक्षेच्या वेळी अपंग उमेदवारांना लेखनिक उपलब्ध करुन देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. सदर परिपत्रक कृपया संदर्भित करावे व त्यानुसार लेखनिकाची आवश्यकता असल्यास त्याबाबत अर्जामध्ये स्पष्टपणे नमूद करावे.

II) अपंग उमेदवाराने परीक्षा आयोजित करणा-या संबंधित यंत्रणेकडून लेखनिक घेणार आहे किंवा उमेदवार स्वत: लेखनिकाची व्यवस्था करणार आहे याबाबत अर्जात स्पष्ट उल्लेख करावा.

III) अपंग अर्जदार लेखनिकाची व्यवस्था करणार असल्यास त्याने अर्जात लेखनिकाचे नाव, पदनाम, खाते / विभाग नमूद करावे तसेच लेखनिक कर्मचा-यास त्यांच्या खातेप्रमुखांची परवानगी घेणे आवश्यक आहे.

IV) अपंग अर्जदाराला लेखनिकाच्या कोणत्याही चूकीबद्दल माझी तक्रार असणार नाही अशा आशयाचे हमीपत्र दयावे लागेल.

सर्व खाते प्रमुख / विभागीय सहायक आयुक्त यांनी हे परिपत्रक त्यांच्या कार्यालयातील सूचना फलकावर लावून तसेच ते कर्मचा-यांमध्ये प्रसारित करुन त्यास पुरेशी प्रसिध्दी देऊन कर्मचा-यांचे सेवाभिलेखाद्वारे पडताळलेले अर्ज अनुज्ञापन अधीक्षक यांच्याकडे नियत दिनांकापूर्वी पाठविण्याची व्यवस्था करावी.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| सही/-12.08.16 | सही/-19.08.16 | सही/-20.08.16 | सही/-26.08.16 | सही/-31.08.16 | सही/-03.09.2016 |
| (शरद भा.बांडे) | (प्र.ता.वाघमारे) | (प्रकाश पाटील) | (सुधीर नाईक) | (पल्लवी दराडे) | (आय.ए.कुंदन) |
| अनुज्ञापन अधीक्षक | प्रमुख कर्मचारी अधिकारी | उप आयुक्त (विशेष) | उप आयुक्त (सा.प्र.) | अति. आयुक्त (शहर) | अति. आयुक्त (प.उप.) |

**अनुज्ञापन अधीक्षक यांचे कार्यालय,**

दादर उदंचन केंद्र,6 वा मजला, मलःनिसारण प्रचालन प्रशासकीय इमारत, 249, सेनापती बापट मार्ग,दादर (प.),मुंबई - 028.

दूरध्वनी क्र.24211206, फॅक्स-24211207

परिपत्रक क्र.अअ/ 05, सन 2016-17, दि.26.09.2016

उप विभाग – आस्था-1,
संदर्भ – अअ/ 13030 /आस्था-1

प्रत : ______________ ______________ यांच्या माहितीकरिता (जादा ______ प्रतींसह )

माहितीसाठी व कार्यवाहीसाठी रवाना.

अनुज्ञापन अधीक्षक

# बृहन्मुंबई महानगरपालिका
## अर्जाचा नमूना

प्रति,

अनुज्ञापन अधीक्षक

दादर उदंचन केंद्र, 6 वा मजला,

मलःनिसारण प्रचालन प्रशासकीय इमारत कार्यालय,

249, सेनापती बापट मार्ग,

दादर (प.), मुंबई - 400 028.

आपल्या खात्यातील निरीक्षक (अनुज्ञापन) या पदाकरिता परिपत्रक क्र.अअ/ /आस्था-1 सन 2016-17 दि. ____________ नुसार मी अर्ज सादर करीत आहे.

1 संपूर्ण नांव (आडनाव प्रथम) :

| | | |
|---|---|---|
| | | |
| आडनाव | नाव | वडिलांचे /पतीचे नाव |

2 कर्मचारी संकेतांक : ______________________

3 कार्यरत असलेल्या खात्याचे नांव : ______________________

4 सध्याचे पदनाम व त्यावरील नियुक्तीची तारीख : ______________________

5 सध्याचे वेतन व वेतनश्रेणी : ______________________

6 महानगरपालिकेतील प्रथम नियुक्तीचे पद व दिनांक : ______________________

7 लिपिक व परिपत्रकात नमूद केलेल्या तत्सम पदावर 5 वर्षे पूर्ण झाल्याचा दिनांक : ______________________

8 लिंग : पुरुष ☐ स्त्री ☐

9 जन्मदिनांक :

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |
| दिनांक | | महिना | | वर्ष | | | |

10 शैक्षणिक अर्हता :

| शैक्षणिक अर्हता | विद्यापीठ / संस्थेचे नाव | प्राप्त झालेले गुण | | |
|---|---|---|---|---|
| | | एकूण | पैकी | टक्केवारी |
| | | | | |

10A MSCIT परीक्षा उत्तीर्ण केली आहे का? : ______________________
असल्यास, प्रमाणपत्राची प्रत संलग्न करावी.

10B महिला आरक्षणाचा लाभ घेऊ इच्छिते का? : ______________________

11 उमेदवार ज्या प्रवर्गाचा आहे त्यापूढे (✓) असे चिन्ह करा.:

| अ.जा. | अ.ज. | विजा(अ) | भज(ब) | भज(क) | भज(ड) | विमाप्र | इमाव | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | |

12 (अ) उमेदवार नि:समर्थ असल्यास नि:समर्थतेचा प्रवर्ग- :
1. अंशतः कर्णबधीर(HH) 2. एका पायाने नि:समर्थ असलेल्या (OL) 3. एका हाताने नि:समर्थ असलेला (OA) 4. एका हाताने आणि एका पायाने नि:समर्थ असलेला (OAL)

(HH) ____________
(OL) ____________
(OA) ____________
(OAL) ____________

(ब) नि:समर्थतेचे किमान प्रमाण 40% असणे आवश्यक आहे. तसेच नि:समर्थतेच्या प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत जोडणे आवश्यक आहे. : आहे / नाही (प्रत सोबत जोडावी)

(क)लेखनिकाची आवश्यकता आहे काय? आहे / नाही

(ड)असल्यास, लेखनिकाची व्यवस्था स्वतः करणार आहे किंवा परीक्षा प्राधिका-याकडून लेखनिक घेणार आहे स्वत: / प्राधिका-याकडून

लेखनिकाची व्यवस्था स्वतः करणार असल्यास, :

| लेखनिकाचे नाव | पदनाम | खाते / विभाग |
|---|---|---|
| | | |

13 (अ) उमेदवारास पूर्वी शिक्षा झाली होती का? ____________

(ब) शिक्षा झाली असल्यास त्याचा तपशील नमूद करण्यात यावा. व शिक्षादेशाची प्रमाणित प्रत अर्जासोबत जोडण्यात यावी. ____________

14 (अ) उमेदवाराविरुद्द खात्यांतर्गत चौकशी / पोलीस चौकशी / न्यायालयीन प्रकरण प्रलंबित किंवा प्रस्तावित आहे का? ____________

(ब) असल्यास त्याबाबतचा तपशील द्यावा. ____________

मी यान्वये प्रतिज्ञापूर्वक असे जाहीर करतो / करते की, वरील माहिती जाणीवपूर्वक तसेच विश्वासपूर्वक दिली असून, ती खरी आहे. परिपत्रकात दिलेल्या सर्व निकषांनुसार व शैक्षणिक अर्हतेनुसार मी पात्र आहे. त्यापैकी कोणतीही माहिती खोटी आढळल्यामुळे माझा अर्ज फेटाळून लावल्यास किंवा निवडीच्या कुठल्याही टप्प्यावर माझी उमेदवारी रद्द केल्यास त्याबाबत माझी काहीही तक्रार रहाणार नाही.

आपला / आपली विश्वासू,

अर्जदाराची सही

( )

अर्जदाराचे नाव

दिनांक : ____________

---

(ज्या खात्यात कर्मचा-याचा सेवाभिलेख परिरक्षित केला असेल अशा खात्याने द्यावयाचे प्रमाणपत्र)

श्री./श्रीमती ____________ ____________ यांनी उपरोक्त अर्जात नमूद केलेली माहिती कर्मचा-यांच्या सेवाभिलेखाशी पडताळली असून ती बरोबर आहे. अर्जदाराने नियुक्तीच्या वेळी किंवा नंतर आरक्षणाचा फायदा घेतला आहे / नाही, याबाबत खात्री करण्यात आली आहे.

संबंधित खाते प्रमुखाची स्वाक्षरी

# बृहन्मुंबई महानगरपालिका
## अनुज्ञापन खाते

विषय – निरिक्षक (अनुज्ञापन) पदासाठी महानगरपालिकेतील कर्मचा-यांमधून विहित अर्हतेनुसार उमेदवारांची निवड करण्याबाबत.

संदर्भ - परिपत्रक क्र.अअ/०५, दि.२६.०९.२०१६

उपरोक्त संदर्भीत प्रसृत केलेल्या परिपत्रकामध्ये शुद्धीपत्रकास मा.अति.आयुक्त(शहर) यांचे क्र.अति.आ./शहर/३७६५, दिनांक १४.१०.२०१६ अन्वये मान्यता दिलेली असून, तदनुषंगाने खालीलप्रमाणे शुद्धीपत्रक काढण्यात येत आहे.

| क्र. | मूळ परिपत्रकातील विहित अर्हता | सुधारित अर्हता |
|---|---|---|
| १. | सदर लेखी परीक्षेमध्ये उत्तीर्ण होण्यासाठी उमेदवाराने 'अ' व 'ब' विभागात प्रत्येकी किमान 40% गुण मिळविणे आवश्यक राहील. तसेच निरीक्षक (अनुज्ञापन) पदासाठी पात्र होण्यासाठी 100 पैकी एकूण किमान 50 गुण मिळविणे आवश्यक आहे." | सदर लेखी परिक्षेमध्ये उत्तीर्ण होण्यासाठी उमेदवाराने अ ते ड विभागात १०० पैकी एकुण किमान ५० गुण निरिक्षक पदासाठी पात्र होण्यासाठी मिळविणे आवश्यक आहे |
| २. | दिनांक 04.09.2016 रोजी किमान 5 वर्षे अखंड सेवा झालेल्या पदवीधर पुरुष / महिला कर्मचा-यांकडून सोबत जोडलेल्या विहित नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत. | दिनांक 04.09.2016 रोजी किमान 3 वर्षे अखंड सेवा झालेल्या पदवीधर पुरुष / महिला कर्मचा-यांकडून सोबत जोडलेल्या विहित नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत. |

| | | | |
|---|---|---|---|
| सही/-04.10.16 | सही/-06.10.16 | सही/-10.10.16 | सही/-14.10.16 |
| (शरद भा.बांडे) | (प्रकाश पाटील) | (सुधीर नाईक) | (पल्लवी दराडे) |
| अनुज्ञापन अधीक्षक | उप आयुक्त (विशेष) | उप आयुक्त (सा.प्र.) | अति. आयुक्त (शहर) |

**अनुज्ञापन अधीक्षक यांचे कार्यालय,**

दादर उदंचन केंद्र,6 वा मजला, मलःनिसारण प्रचालन प्रशासकीय इमारत, 249, सेनापती बापट मार्ग,दादर (प.),मुंबई - 028.

दूरध्वनी क्र.24211206, फॅक्स-24211207

परिपत्रक क्र.अअ/ , सन 2016-17, दि. 20.10.2016

उप विभाग – आस्था-1,

संदर्भ – अअ/ 14799/आस्था-1

प्रत : ______________________ यांच्या माहितीकरिता (जादा ______ प्रतींसह )

माहितीसाठी व कार्यवाहीसाठी रवाना.

20/10/16

अनुज्ञापन अधीक्षक